सकाळ

# जीवनशैलीविषयी 'रवळनाथ'मध्ये व्याख्यान

**गडहिंग्लज, ता. ३० :** स्थूलत्व व मधुमेहमुक्त विश्व अभियानाचे संकल्पक डॉ. जगन्नाथ दीक्षित यांच्या जीवनशैलीचा लाभ गडहिंग्लज विभागातील लोकांना व्हावा, यासाठी गडहिंग्लजमध्ये डॉ. दीक्षित सल्ला केंद्र सुरू करण्याचा मानस आहे, अशी माहिती श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्सचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.



**गडहिंग्लज : रवळनाथ संस्थेतील कार्यक्रमात बोलताना एम. एल. चौगुले. शेजारी डॉ. आर. एस. निळपणकर, डॉ. दत्ता पाटील, प्रकाश चव्हाण आदी.**

कुडाळ येथील डॉ. दीक्षित सल्ला केंद्राचे समन्वयक प्रकाश चव्हाण यांच्या डॉ. दीक्षित जीवनशैली या विषयावरील व्याख्यानप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. संस्थेच्या प्रधान कार्यालयात हा कार्यक्रम झाला. संचालक बसाप्पा आरबोळे, महेश मजती, डॉ. किरण पोतदार, उमा तोरगल्ली, नंदकुमार शेळके, विलास कुलकर्णी, डॉ. दत्ता पाटील, सीईओ डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, प्रशासन अधिकारी सागर माने, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड, 'झेप'च्या समन्वयक गौरी बेळगुद्री, शाखाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मीना रिंगणे यांनी स्वागत केले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
31/07/2021 Page No. 2

बुधवार, २८ जुलै २०२१

तरुण भारत




**गडहिंग्लज : इंजि. प्रकाश चव्हाण मार्गदर्शन करत असून व्यासपीठावर संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले, आर. एस. निळपणकर, मिना रिंगणे.**

# गडहिंग्लज रवळनाथ सोसायटीत इंजि. प्रकाश चव्हाण यांचे मार्गदर्शन

**गडहिंग्लज :** कुडाळ येथील डॉ. दिक्षित सल्ला केंद्राचे समन्वयक इंजि. प्रकाश चव्हाण यांचे व्याख्यान रवळनाथ हौसिंग सोसायटी संस्थेच्या मुख्य कार्यालयात पार पडले. रक्तदाब, मधूमेह व हृदयविकार टाळण्यासाठी सर्वांनी डॉ. दिक्षित जीवनशैली अंगीकारण्याची आवश्यकता असल्याचे श्री. चव्हाण यांनी सांगितले. यावेळी डॉ. दिक्षित यांचे सल्ला केंद्र गडहिंग्लजला सुरू करण्याचा मानस रवळनाथचे अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी व्यक्त केला. प्राचार्य मिना रिंगणे यांनी स्वागत तर प्राचार्य आर. एस. निळपणकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास बसाप्पा आरबोळे, महेश मजती, डॉ. किरण पोतदार, उमा तोरगल्ली, नंदकुमार शेळके, विलास कुलकर्णी, सीईओ डी. के. मायदेव, व्यवस्थापन शिवानंद घुगरे, सागर माने, बाबासो मार्तंड, गौरी बेळगुद्री आदी उपस्थित होते.